**जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा विभाग/उप विभागांमध्ये कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी वृदांच्या सेवा "जलस्वराज्य" प्रकल्पासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन निर्णय क्र. ग्रापापु-१००३/प्रक्र-२००/ पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक १७ सप्टेंबर, २००३**

**प्रस्तावना :**

जागतिक बँकेच्या सहाय्याने राज्यामध्ये महाराष्ट्र ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता प्रकल्प **(जलस्वराज्य प्रकल्प)** २६ जिल्हयांमध्ये राबविण्यात येणार आहे. यापैकी ९ जिल्हयांमध्ये **(ठाणे, सातारा, सांगली, उस्मानाबाद, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर व चंद्रपूर )** पहिल्या टप्प्यात प्रकल्प राबविण्यास सुरुवात करण्यास जागतिक बँकेने मान्यता दिली असल्याने, अंमलबजावणीची पूर्व तयारी सुरु आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम १९६१ अन्वये जिल्हा परिषदांमध्ये गठीत करण्यात आलेल्या जिल्हा पाणी पुरवठा व जलसंधारण समिती या सांवीधीक विषय समितीस प्रकल्पासंबंधीचे, शासनाने जागतिक बँकेशी केलेल्या कराराच्या अधीन राहून सर्व धोरणात्मक कामकाजाचे अधिकार व जबाबदारी राहाणार आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे या प्रकल्पाचे जिल्हा प्रकल्प संचालक असणार आहेत तर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे प्रकल्पाचे जिल्हा प्रकल्प समन्वयक आहेत व सर्व अंमलबजावणी यंत्रणा त्याचे नियंत्रणाखाली राहणार आहे. हा प्रकल्प राबविण्यासाठी या जिल्हयांमधील जिल्हा परिषदांमध्ये प्रकल्पाच्या तयारीसाठी व अंमलबजावणीसाठी वेगवेगळया टीम (चमु) गठीत करावयाच्या आहेत. त्यामध्ये **(१) जिल्हा सुविधा चमू** (District Facilitation Team), **(२) जिल्हा मुल्यमापन व संनियंत्रण चमू** (District Apprisal and Monitoring Team), **(३) जिल्हा आर्थिक व्यवस्थापन चमू** (District Financial Management Team) यांचा समावेश आहे.

२. राज्यातील २६ जिल्हयांमध्ये जागतिक बँकेचा हा जलस्वराज्य प्रकल्प राबविण्यास सुरुवात झाल्यानंतर पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रामध्ये लोकसहभागातून राबविण्यात येणारे सर्वच कार्यक्रम या चमुमार्फत राबविण्यात येणार आहेत. त्यामुळे, जिल्हास्तरावर सध्या कार्यरत असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा विभाग/उप विभागामधील कामांचा कार्यभार मोठया प्रमाणात कमी होणार आहे. तसेच बरीच कामे



५७७

(नियोजन, अंमलजबजावणी, देखभाल दुरुस्ती इ.) प्रत्यक्ष ग्रामस्तरावर होणार असल्याने हा कर्मचारी वर्ग अधिक ही होऊ शकेल. जिल्हास्तरावरील ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडे खासदार/आमदार निधीमधील कामे तसेच टंचाई कार्यक्रम या व्यतिरिक्त कोणत्याही कार्यक्रमाची सरळ अंमलबजावणी राहणार नाही. त्यामुळे, जिल्हास्तरावरील ग्रामीण पाणी पुरवठा विभागामधील खासदार/आमदार निधीमधील कामांसाठी तसेच टंचाई अंतर्गत कामांसाठी व इतर कामांसाठी जिल्हा परिषदांमधील ग्रामीण पाणी पुरवठा विभागात पुरेसे कर्मचारी उपलब्ध आहेत. या कामांसाठी उपलब्ध कर्मचाऱ्यांमधून आवश्यक पदे ठेवून कांही पदे जलस्वराज्य प्रकल्पासाठी पूर्णवेळ किंवा अर्धवेळ उपलब्ध करुन देता येऊ शकतील. ही बाब विचारात घेऊन ग्रामीण पाणी पुरवठा विभाग/उप विभागातील कर्मचारी वृंदाचा आढावा घेऊन ग्रामीण पाणी पुरवठा विभाग/ उप विभागातील आकृतीबंध सुधारित करण्याची बाब विचाराधीन आहे. याबाबत विचार पूर्ण होऊन अंतिम निर्णय घेण्यास आणखी कांही कालवधी लागण्याची शक्यता आहे. तोपर्यंत या ९ जिल्हयातील जलस्वराज्य प्रकल्प राबविण्यासाठी जिल्हा परिषदेमध्ये ग्रामीण पाणी पुरवठा विभाग/उप विभागामधील काही पदे स्वतंत्रपणे पूर्णवेळ अथवा अर्धवेळ उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

प्रस्तावनेत नमुद केलेल्या बाबींचा विचार करुन, महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम १९६१ च्या कलम २६१ (१) अनुसार, शासनास असलेल्या अधिकारांचा वापर करुन उक्त अधिनियमाच्या कलम २६१ (२ अ) अनुसार **ठाणे, सातारा, सांगली, नाशिक, उस्मानाबाद, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर व चंद्रपूर** या जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाशी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांपैकी या **शासन निर्णयासोबतच्या जोडपत्रामधील रकाना क्र.२** मध्ये दर्शविलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवा संबंधित जिल्हयात जागतिक बँकेच्या सहाय्याने **महाराष्ट्र ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता प्रकल्प (जलस्वराज्य प्रकल्पाकरिता)** उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत या अधिकारी/कर्मचाऱ्यांचे पदनाम या **शासन निर्णयासोबतच्या जोडपत्रामधील रकाना क्र.३** मध्ये दर्शविल्यानुसार राहील. जलस्वराज्य प्रकल्पासाठी अधिग्रहीत केलेल्या त्यांच्या सेवांचे स्वरुप व अतिरिक्त मोबदला शासन निर्णयासोबतच्या जोडपत्रामधील रकाना क्र.६ मध्य नमूद केल्याप्रमाणे राहील.

२. जिल्हा परिषदेमधील ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील उपरोक्त अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या सेवा जलस्वराज्य प्रकल्पासाठी जरी उपलब्ध करुन देण्यात आल्या असल्या तरी ते अधिकारी व कर्मचारी सध्या प्रमाणेच जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवरच त्या त्या संवर्गात कार्यरत राहतील व त्यांचे वेतन व भत्ते शासनाकडून जिल्हा परिषदेस उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा विभागाच्या अनुदानातून जिल्हा



४६२

परिषदेमार्फत सध्याच्या पध्दतीनुसार देण्यात येतील. तथापि, जलस्वराज्य प्रकल्पासाठी मंजूर केलेल्या मुळ वेतनाच्या २५% अतिरिक्त वेतनावरील खर्च सबंधित जिल्हयास जलस्वराज्य प्रकल्पासाठी मंजूर करण्यात येणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा. हा अतिरिक्त भत्ता प्रदान करण्याचे सर्वसाधारण नियम जलस्वराज्य प्रकल्पाच्या राज्यस्तरीय कक्षाकडून स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

३. जिल्हा स्तरावर जलस्वराज्य प्रकल्पाच्या तयारीसाठी व अंमलबजावणीसाठी ज्या वेगवेगळया चमू तयार करण्यात येणार आहेत त्या चमुंमार्फत जलस्वराज्य प्रकल्पाबरोबरच ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रामध्ये लोकसहभागातून राबविण्यात येणारे सर्व कार्यक्रम राबविण्याचे प्रस्तावित आहेत. त्याबाबतचे आदेश आवश्यकतेनुसर वेळोवेळी निर्गमित करण्यात येतील. या कार्यक्रमाव्यतिरिक्त जिल्हास्तरावरील इतर कर्मच्याऱ्यांमार्फत (या शासन निर्णयासोबतच्या जोडपत्रात दर्शविलेल्या पदाव्यतिरिक्त) राबविण्यात यावेत.

४. जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा विभागामधील सर्व प्रकल्पांसाठी प्रशासन शाखा मात्र सामाईक असेल. प्रशासन शाखेमार्फत सर्व प्रकल्पांची आस्थापनाविषयक कामे करण्यात यावीत.

५. नागपूर जिल्हा परिषदेतील ग्रामीण पाणी पुरवठा विभागासाठी कक्ष अधिकाऱ्याचे पद मंजूर नसल्याने सदर पद मंजूर होईपर्यंत तात्पुरती व्यवस्था म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी जलस्वराज्य प्रकल्पासाठी जिल्हा परिषदे अंतर्गत इतर विभागातील कक्ष अधिकारी उपलब्ध करुन घ्यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

**(सुधाकर ज्ञा. बोबडे)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,
१. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव,
२. मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव
३. मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद, ठाणे, सातारा, सांगली, नाशिक, उस्मानाबाद, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर व चंद्रपूर.
४. मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
५. मा. प्रधान सचिव, (ग्रावि.) ग्राम विकास व जलसंधारण विभाग
६. विभागीय आयुक्त (सर्व)
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
८. उप सचिव व प्रकल्प संचालक, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, मंत्रालय, मुंबई-३२.
९. जिल्हाधिकारी, ठाणे, सातारा, सांगली, नाशिक, उस्मानाबाद, बुलढाणा, यवतमाळ , नागपूर, चंद्रपूर



४७३

१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे, सातारा, सांगली, नाशिक, उस्मानाबाद, बुलढाणा, यवतमाळ , नागपूर, चंद्रपूर

११. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे, सातारा, सांगली, नाशिक, उस्मानाबाद, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर व चंद्रपूर.

१२. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे

१३. प्रकल्प व्यवस्थापक, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, सिडको भवन, बेलापूर नवी मुंबई (१० जादा प्रतीसह)

१४. महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)

१५. महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)

१६. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे, सातारा, सांगली, नाशिक, उस्मानाबाद, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर व चंद्रपूर.

१७. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, ठाणे, सातारा, सांगली, नाशिक, उस्मानाबाद, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर व चंद्रपूर.

१८. जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे, सातारा, सांगली, नाशिक, उस्मानाबाद, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर व चंद्रपूर.

१९. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने

२०. निवडनस्ती पापु-०७.



५७८

## जोडपत्र

**शासन निर्णय क्र.ग्रापापु-१००३/प्र.क्र. २००/पापु-७, दिनांक १७ सप्टेबर २००३ चे जोडपत्र.**

| अ. क्र. | जि.प. मधील ग्रापापु विभागामधून सध्या उपलब्ध पदांपैकी जलस्वराज्य प्रकल्पासाठी उपलब्ध करुन द्यावयाचे अधिकारी /कर्मचारी (पदनाम) | जलस्वराज्य प्रकल्पसाठी पदनाम | पदांची संख्या | वेतनश्रेणी रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | कार्यकारी अभियंता (अर्धवेळ यांनी जलस्वराज्याच्या कामाशिवाय टंचाई इत्यादीसाठी काम करावयाचे आहे) | Team Leader (DAMT) | १ | १०६५०-१५८०० | या सर्व पदावर कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना जलस्वराज्य प्रकल्पाचे कामासाठी मूळ वेतनाच्या २५% जादा प्रकल्प भत्ता जागतिक बँक निधीतून उपलब्ध होईल, मात्र या पदांचे वेतन व भत्ते सध्याप्रमाणेच शासनाकडून जिल्हा परिषदेस उपलब्ध करुन देण्यात येतील, मात्र त्याच्या सेवा जिल्हा परिषद पूर्णतः जलस्वराज्य प्रकल्पासाठी वापरेल. (क्र.१,४ व ५ वरील पदे वगळता) क्र.९ वरील पदांकरिता संगणकाचे पुरेसे ज्ञान असणाऱ्या जिल्हा परिषदेतील कनिष्ठ सहाय्यक उपलब्ध करुन त्यातून हे पद मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यानी भरावे. |
| २ | कनिष्ठ भूवैज्ञानिक (पूर्णवेळ) | Ground Water Specialist (DAMT) | १ | ६५००-१०५०० | |
| ३ | शाखा अभियंता/कनिष्ठ अभियंता (पूर्व वेळ) | Engineering Assistant (for DFT & DAMT one each) | २ | ६५००-१०५००/ ५५००-९००० | |
| ४ | सहाय्यक लेखा अधिकारी (अर्धवेळ) | सहाय्यक लेखा अधिकारी (DFMT) | १ | ५५००-९००० | |
| ५ | कक्ष अधिकारी (अर्धवेळ) | कक्ष अधिकारी (प्रशासन शाखा) | १ | ५५००-९००० | |
| ६ | वरिष्ठ सहाय्यक (पूर्ण वेळ) | वरिष्ठ लिपिक (प्रशासन शाखा) | ४ | ४०००-६००० | |
| ७ | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) (पूर्ण वेळ) | वरिष्ठ लिपिक (लेखा) (DFMT) | १ | ४०००-६००० | |
| ८ | कनिष्ठ सहाय्यक (पूर्ण वेळ) | रोखपाल (DFMT) | १ | ३०५०-४५९० | |
| ९ | संगणक (पूर्ववेळ) | MIS Assistant (DAMT) | १ | ३०५०-४५०० | |
| | | एकूण पदे | १३ | | |